
पऱ्यांच्या
अद्भुत दुनियेत
मोहन रावळ
परी प्रकाशन

पऱ्यांच्या अद्‌भुत दुनियेत

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी


**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका




१. हिमगौरी व सात बुटके ........ ३
२. 'जूजू'ची गंमत ............... १३
३. परीची कृपा आणि ऑड्रीची... १९
४. चिटपिट .................... २९
५. हॅपी बर्थ डे ! ................. ३४
६. ट्रीकन परी व तीन शिलेदार .... ३८
७. गुलनार आणि इशान .......... ५०
८. मंजू आणि जलपरी ........... ६१
९. टायचेनची चंद्रिका परी ....... ६९
१०. फूलपऱ्या .................... ७९
११. दयाळू परी .................. ८३
१२. इस्काना परी व काळसर्प ....... ८६
१३. हनी परी ..................... १०१
१४. कांचन परी आणि जादूचा तलाव १०४
१५. देवव्रत व शितल परी .......... ११३
१६. गुलशन परीची कथा .......... १२०
१७. धर्मसेनची विश्वल परी ........ १३१
१८. टिक् टिक् परी ............... १३८
१९. सात पऱ्या .................. १४२
२०. जिनी परी ................... १५१



# हिमगौरी व सात बुटके

हिवाळ्याचे महिने. सगळीकडे भुरूभुरू पडणारे बर्फकण. जणू पांढऱ्या कोंबडीची पिसं ढगात बसून कोणीतरी धरतीवर टाकत असावा. झाडं–वेली, रस्ते, घरांची छपरं, खाचखळगे सगळं बर्फ कणांच्या थरांनी भरलेलं. पहावं तिकडं पांढरं पांढरं बर्फ. घोड्यांच्या, माणसांच्या, मांजर कुत्र्यांच्या नाकातून उच्छ्वासातून वाफा बाहेर पडत होत्या. हातावर हात घासल्याशिवाय ऊब मिळत नव्हती. घराघरातून शेकोट्या पेटल्या होत्या. पायमोजे, बूट, अंगभर कपडे, स्कार्फ व कानटोप्या घातल्याशिवाय बाहेर पडताच येत नव्हतं.

अशा थंड वातावरणात खिडकीतून बाहेरचं दृश्य पाहत एक राणी कापडावर कशिदा काढत होती. शिसमच्या काळ्या लाकडी चौकोनात तिने कापड ताणून लावले होते. त्यावर ती फुलं व बुलबुल पक्षी काढत होती. तिच्या सुईत लाल धागा ओवलेला होता व ती फुलपाकळ्या विणत होती. विणता विणता बाहेरचा देखावा खिडकीतून बघत होती.

तिच्या हातातली सुई अचानक तिच्या बोटात रुतली. रक्ताचे तीन चार थेंब पांढऱ्या शुभ्र हिमावर पडले. ते लाल रक्त थेंब जणू ओठांसारखे लाल भासू लागले. जणू गुलाब पाकळ्याच!

राणीच्या मनात विचार आला, 'खरंच, या हिमासारखं शुभ्र वर्णाचं, रक्तासारख्या लाल ओठांचं आणि शिसम चौकटीसारख्या काळ्याभोर केसांचं एक गुटगुटीत बाळ मला असतं तर? यावेळी ते माझ्या मांडीवर बसून बाहेरचा देखावा माझ्याबरोबर पाहत राहिलं असतं! त्याचे बोबडे बोल मला किती आनंददायी वाटले असते!'

परमेश्वराने जणू तिचं मनोगत ऐकलं. वर्षभरातच राणी प्रसूत झाली आणि तिला तिच्या इच्छेप्रमाणे सुंदर मुलगी झाली. ती हिमासारखी गोरीपान, रक्तासारख्या लालचुटूक ओठांची नि काळ्याभोर भरपूर केसांची! राणीनं तिचं नाव ठेवलं स्नो–व्हाईट. अर्थात हिमगौरी! पण दुर्दैव असं



झालं की या बाळाचं बालपण पाहण्याआधीच ती राणी मेली. स्नो-व्हाईट पोरकी झाली.

राणीला मरून वर्ष झाले नाही, तोवरच राजाने दुसरे लग्न केले. ही नवी राणी खूप सुंदर होती परंतु तिला आपल्या सौंदर्याचा अतोनात गर्व होता. तसेच ती दुष्ट, अरेरावी करणारी व कपटी स्वभावाची चेटकीण होती. माझ्यापेक्षा सुंदर कोणी असेल ही कल्पनाच तिला सहन होण्यासारखी नव्हती. तिच्याजवळ जादूचा एक बोलका आरसा होता. ती नेहमी आरशापुढे उभी राही आणि आरशात पाहत त्याला म्हणे,

'हे बिलोरी आरशा, तू पाहतोस मला सारखं
मग सांग खरं, माझ्याइतकं सुंदर आहे कोणी दुसरं?'

आरसा तिला म्हणे-

'नाही गं राणी, तुझ्याइतकं सुंदर कोणी नाही बरं!'

आरशानं तिचं कौतुक केलं की तिला समाधान वाटे. तिचा जादूचा आरसा कधीच खोटं बोलत नसे. मग राणी नट्टापट्टा करून राजदरबारात जाई. तिचे सौंदर्य पाहून सर्वजण तिला अदबीनं मुजरे करीत.

दिवस आपल्या गतीने सरकत होते. कित्येक हिवाळ्याचे दिवस मागे पडले. इकडे दासींनी वाढवलेली स्नो-व्हाईट मोठी होत होती. दिवसेंदिवस ती अतिशय सुंदर दिसू लागली. फुलांनी देखील वळून पाहावं आणि पाखरांनी तिला पाहून शीळ घालावी अशी ती रूपवान झाली. ती सात-आठ वर्षाचीच होती. बागेत जाऊन ती फुलांशी बोलत असायची!

एके दिवशी राणी आरशापुढे उभी राहिली व म्हणाली-

'हे बिलोरी आरशा, तू पाहतोस मला सारखं
मग सांग खरं, माझ्याइतकं सुंदर आहे कोणी दुसरं?'

तेव्हा जादूचा आरसा पटकन् म्हणाला-

'राणी गं राणी, तू खूप सुंदर असलीस जरी-
हिमगौरी तुझ्यापेक्षा जास्त रूपवान खरी!'


हे ऐकताच राणीच्या अंगाचा तिळपापड झाला. ती द्वेषाने, मत्सराने पेटून उठली. ती स्नो-व्हाईट उर्फ हिमगौरीचा राग करू लागली. माझ्यापेक्षा हिमगौरी सुंदर ही गोष्ट तिला सहन झाली नाही. तिला काय करावे हेच सुचेना.

त्या कपटी राणीने एका शिकाऱ्याला बोलावले व म्हणाली, 'या मुलीला तू घेऊन जा, आताच्या आता माझ्या नजरेसमोरून दूर कर. जंगलात नेऊन तिला ठार कर आणि तिचे काळीज मला आणून दाखव.' राणी चेटकीणच होती. तिला कसली दया न् माया? तिने शिकाऱ्याला बक्षिसी दिली व गुप्तता राखण्यास सांगितले.

शिकाऱ्याने स्नो-व्हाईटला एका पोत्यात घातले व दाट जंगलात घेऊन गेला. आसपास कोणी नसल्याचं पाहून त्याने स्नो-व्हाईटला पोत्यातून बाहेर काढले. मग धारदार सुरा उंच धरला. इतक्यात त्या शिकाऱ्याचे पाय धरून स्नो-व्हाईट गयावया करत म्हणाली, 'अहो, शिकारीबाबा माझ्यावर दया करा. मला मारू नका. या दाट अरण्यात कुठंही सोडून द्या. मी कुठंही निघून जाईन पण राणीच्या घरी यायची नाही.'

हिमगौरीची विनवणी व तिचा निष्पाप लोभसवाणा चेहरा पाहून शिकाऱ्याला तिची दया आली. तो म्हणाला, 'जा पळ इथून. ताबडतोब निघून जा.'


शिकाऱ्याच्या मनात आले, हिला मी मारायची गरजच नाही. या जंगलात कितीतरी हिंस्र श्वापदं आहेत. कोणीही हिला खाऊन टाकेल. त्याच्या मनावरचे दडपण कमी झाले.



शिकारी घरी जात असताना एक रानडुक्कर त्याच्या अंगावर धावून आले. शिकाऱ्याने त्याला भाला मारून ठार केले. मग सुऱ्याने त्याला फाडून त्याचे काळीज त्याने रुमालात बांधून घेतले व राणीकडे आला. राणीला रानडुकराचे काळीज दाखवत तो म्हणाला, 'राणीसाहेब, हे पहा स्नो-व्हाईटचे काळीज! मी तिला ठार केले.' राणीला आनंद वाटला. राणीने ते काळीज शिजवून खाऊन टाकले. यापुढे स्नो-व्हाईट दिसणार नाही याची तिला पुरेपूर खात्री झाली.

स्नो-व्हाईट जंगलात धावत-पळत सुटली पण खूप घाबरली होती ती. जंगलातील निरनिराळ्या पशूंचे आवाज थरकाप उडवणारे होते. पानापानातून सळसळ होत होती. रानटी जनावरे आसपास वावरत आहेत असे भास तिला होत होते. तिचे काळीज थाड्थाड् उडत होते. पण त्या पशूंनी, जंगलातील काट्याकुट्यांनी तिला काहीच इजा केली नाही. ती धावत एका दरीत पोहोचली होती.

संध्याकाळची गार हवा गारठून टाकणारी होती. ढगही दरीत उतरल्यासारखे होऊन अंधारून आले होते. कुठं जावं? स्नो-व्हाईट काळजीत पडली. ती तसेच चालत राहिली. समोर तिला



अगदी छोटेसे घर दिसले. स्नो-व्हाईटला वाटले इथेच विश्रांती घ्यावी. बाहेर क्रूर श्वापदांचा धोका होता.

त्या छोट्या घरात तिने भीतभीत प्रवेश केला. आत पाहिले तर घरातील सर्वच वस्तू छोट्या छोट्या होत्या. आतील खोलीच्या मधोमध छोटेसे टेबल होते. त्यावर टेबलक्लॉथ अंथरले होते. टेबलावर जेवणाची सर्व व्यवस्था होती. सात छोटी ताटं, काटे चमचे, टॉवेल, सात वाडगे आणि ग्लास. शिवाय भिंतीला टेकून सात छोटे पलंगही होते. त्याच्यावर मऊ गाद्या, उशा व चादरी होत्या.

स्नो-व्हाईटला अगदी कडकडून भूक लागली होती. दिवसभर पळून दमली होती ती. तहानलेली होती. तिने सात ताटामधील थोडी थोडी लापशी खाल्ली. थोडा थोडा पाव खाल्ला. एकाचेच जेवण संपवण्यापेक्षा सात ताटामधील थोडे थोडे अन्न तिने खाल्ले होते.

तोपर्यंत खूप काळोख झाला. दाराशी चाहूल लागली. त्या घराचे मालक घरात प्रवेश करीत होते. ते सात बुटके होते. प्रत्येकाने एकेक मेणबत्ती पेटवली त्यामुळे घरात लख्ख उजेड पडला. ते सातहीजण डोंगरातल्या सोन्याच्या खाणीत कामाला जात होते.

त्यांच्या लक्षात आले की, घरातल्या वस्तू जागच्या जागी नाहीत. 'अरे माझ्या पावाचा कोपरा कोणीतरी खाल्ला आहे.'

'माझी थोडी लापशी संपली आहे.' 'हे काय माझा काटा-चमचा कोणीतरी वापरला आहे.' 'माझा कप कुणीतरी उष्टवला आहे.' सगळे बुटके बडबडू लागले. 'ते पहा, माझ्या पलंगावर कोणीतरी झोपलं असावं. तो खळगा दिसतो ना!'

'अरेच्या, आमच्याही पलंगावर खळगे पडलेत.'

सातव्या बुटक्याचे आपल्या पलंगाकडे लक्ष गेले तसे तो दचकला. त्याच्या पलंगावर स्नो-व्हाईट झोपली होती. 'अरे हे कोण झोपलंय माझ्या पलंगावर?' तो ओरडला. सर्वजण मेणबत्त्या घेऊन पळत आले. आश्चर्याने पाहू लागले.

'बाप रे! केवढी सुंदर आहे हे मुलगी! कमालीची सुंदर आहे.' सगळेच म्हणू लागले. सगळ्या बुटक्यांना खूप आनंद झाला. त्यांनी तिला उठवले नाही. तसेच शांत झोपू दिले. सातवा बुटका खुर्चीवर बसून पेंगत राहिला.

सकाळी पाखरांच्या किलबिलाटानं हिमगौरी जागी झाली. सात बुटके तिच्याभोवती पलंगाला टेकून उभे होते. ती घाबरली, परंतु ते सातहीजण प्रेमळ नजरेने तिच्याकडे पाहत होते. त्यांनी तिला विचारले, 'हे सुंदर मुली, तुझं नाव काय?'

'स्नो-व्हाईट माझं नाव!'


'आमच्या या छोट्याश्या घरी कशी आलीस?'

स्नो-व्हाईटने त्यांना आपली सर्व हकीकत सांगितली. तिच्या सावत्र आईने तिला ठार मारण्यासाठी एका शिकाऱ्याबरोबर कसे पाठवले व शिकाऱ्याने दया करून कसे सोडून दिले ते सांगून ती मुसमुसू लागली.

बुटके म्हणाले, 'अगं मुली रडू नकोस. घाबरू नकोस. तुला इथं राहायचं असेल तर अगदी निर्धास्तपणे रहा. फक्त तू काय करायचं- घर टापटीप ठेवायचं, कपडे धुवायचे, स्वयंपाक करायचा, शिवणटिपण करायचं. तुला इथं काही कमी पडणार नाही. करशील का हे सगळं?'

'अगदी आवडीनं आणि आनंदानं करीन मी!' स्नो-व्हाईट बोलली.

मग स्नो-व्हाईट तिथंच राहू लागली. तिने सर्व घर स्वच्छ केले. स्वयंपाक करू लागली. बुटक्यांनी तिला बजावले, 'तू इथं आहेस हे कदाचित तिला कळू शकेल असे वागू नकोस. घरात कुणाला घेऊ नकोस.' मग सगळे बुटके



डोंगरावरील सोन्याच्या खाणीत कामाला निघून गेले. संध्याकाळी परत आले तर गरमागरम जेवण तयार होते. त्यांना खूप आनंद झाला. त्या रात्री बुटक्यांनी तिला आग्रहाने आपल्याबरोबर जेवायला घेतले. तिला खूप आनंद झाला.

आपण स्नो-व्हाईटचे काळीज खाल्ले आहे अशा समजुतीत कपटी राणी शांत होती. आता आपल्यापेक्षा कोणी सुंदर नाही या आनंदात ती होती. एकदा ती तिच्या जादूच्या बोलक्या आरशापुढे जाऊन उभी राहिली व म्हणाली,

'हे बिलोरी आरशा, तू पाहतोस मला सारखं-
मग सांग खरं, माझ्याइतकं सुंदर आहे कोणी दुसरं?'
जादूचा आरसा तत्काळ बोलला-
'अगं अगं राणी, फसलीस ना तू शहाणी
दरीतल्या बुटक्यांच्या घरी, आहे सुंदर परी
स्नो-व्हाईट तिचं नाव, कुणी म्हणती हिमगौरी
तुझ्यापेक्षा सुंदर ती, हजार नव्हे लाखात देखणी!'

हे ऐकताच त्या राणीच्या अंगाचा भडका उडाला. ती संतापली. आदळआपट करू लागली. आरसा खरे सांगतो यात शंकाच नव्हती. तिने ओळखले की त्या शिकाऱ्याने आपल्याला हातोहात फसवले. त्याने नक्कीच स्नो-व्हाईटला जिवंत सोडली. ती अजून जिवंत आहे तर!

स्नो-व्हाईटला कसे मारावे याचा विचार ती करू लागली. स्नो-व्हाईट मेल्याशिवाय ती राणी सुंदर आहे, असे कोणी म्हणणार नव्हते. खूप विचार केल्यावर तिला एक युक्ती सुचली. तिने आपले केस रंगवले, चेहरा मलीन केला. एका वयस्क, खेडवळ फेरीवालीचा पेहराव केला. टोल्यात पिना, रिबीन, लेस, चाप, झालरी आदी वस्तू घेतल्या आणि चार डोंगर ओलांडून ती बुटक्यांच्या दरीत आली.

तिने बुटक्यांच्या दाराची कडी ठोठावली व मोठ्याने आरोळी दिली, 'लेस, पिना, रिबीन, झालरी घ्या. छान छान वस्तू घ्या.'

लहान गरीब स्नो-व्हाईट खिडकीतून बाहेर पाहत म्हणाली, 'फेरीवाली बाई कोणकोणत्या वस्तू आहेत तुझ्याकडं?'

फेरीवाली म्हणाली, 'खूप खूप छान छान वस्तू आहेत. रंगीबेरंगी झालरी, रिबीन आहेत. केसांना लावायच्या पिना आहेत. रिबीन आहेत. पहा तरी-'

स्नो-व्हाईटला वाटले, ही गरीब फेरीवाली बाई. तिला घरात घ्यायला काय हरकत आहे? तिने दार उघडून त्या म्हातारीला घरात घेतले. ती घर पाहत हसली. मग म्हणाली, 'अगं माझ्याकडे सुंदर अनेक रंगीबेरंगी लेस आहेत. इकडे ये तरी. तुझ्या या फ्रॉकला लावून तरी बघ. किती सुंदर दिसशील तू!'

तिच्या गोड बोलण्याला भुलून स्नो-व्हाईट तिच्याजवळ गेली. त्याबरोबर त्या कपटी राणीने ती लेस स्नो-व्हाईटच्या गळ्याभोवती टाकली आणि तिचा गळा आवळला. स्नो-व्हाईटचा श्वास कोंडला गेला व ती बेशुद्ध होऊन धाडकन कोसळली. फेरीवाली बनलेली कपटी राणी तेथून घाईघाईने बाहेर पडत म्हणाली, 'सुटले बाई. आता तरी माझ्यापेक्षा सुंदर कोणी नाही राहिलं!'

संध्याकाळ झाली. सात बुटके कामावरून घरी आले. स्नो-व्हाईट बेशुद्ध पडलेली पाहून ते घाबरले. त्यांनी स्नो-व्हाईटच्या गळ्याभोवती आवळलेली लेस कापून काढली. तिच्या तोंडावर गुलाबपाणी शिंपडले. स्नो-व्हाईट हळूहळू श्वासोच्छवास करू लागली. काही वेळातच ती शुद्धीवर आली.

'काय झाले स्नो-व्हाईट?' बुटक्यांनी विचारले.

तिने जे काही घडले ते बुटक्यांना सांगितले. ते पटकन् म्हणाले, 'म्हणजेच फेरीवाली म्हातारीचं सोंग घेऊन आलेली कपटी राणी असली पाहिजे! यापुढे पुन्हा कोणाला घरात घेऊ नकोस.'

दुष्ट कपटी राणी घरी पोहोचली. घाईघाईने तिने तोंड धुतले. पेहराव बदलला व जादूच्या आरशासमोर उभी राहिली आणि म्हणाली-

'हे बिलोरी आरशा, तू पाहतोस मला सारखं-
मग सांग खरं, माझ्याइतकं सुंदर आहे कोणी दुसरं?'

आरशाने पहिल्यासारखंच उत्तर दिले. तो म्हणाला-

'अगं अगं राणी, नाहीस गं तू शहाणी
दरीतल्या बुटक्यांच्या घरी, राहते सुंदर परी
स्नो-व्हाईट तिचं नावं, कुणी म्हणती हिमगौरी
तुझ्यापेक्षा सुंदर ती, चांदणीसारखी देखणी!'

आरशाचे हे बोलणे ऐकताच राणीला मोठा धक्का बसला! म्हणजे ती स्नो-व्हाईट अजून जिवंत आहे तर! ती स्वत:शीच म्हणाली, 'आता मला असं काही करावं लागेल की, तिचा नाश झालाच पाहिजे.'

तिला जादू येतच होती. तिने जादूने एक विषारी फणी तयार केली आणि जख्खड म्हातारीचे रूप घेतले व बुटक्यांच्या दाराशी येत पुकारा केला, 'छान छान फण्या घ्या. छोट्या फण्या, मोठ्या फण्या, कंगवे घ्या.' तिने दार ठोठावले. 'कोणी आहे का घरात?'

स्नो-व्हाईट खिडकीतून डोकावत म्हणाली, 'चल, जा बघू येथून. मला कोणालाही घरात घ्यायचं नाहीये.'

'अगं घरात घेऊ नकोस. पण खिडकीतून वस्तू बघायला हरकत नाही.' म्हणत त्या वृद्धेने ती विषारी फणी हातात घेतली. ती फणी बघताच स्नो-व्हाईटला दार उघडावेसे वाटले. दार उघडताच

ती वृद्धा आत येत म्हणाली, ‘अगं किती सुंदर तलम आणि मोठे केस आहेत तुझे! या फणीने मी तुझे केस विंचरून दाखवते.’

स्नो–व्हाईटने विचार केला, केस विंचरून घेण्यात कसला आलाय धोका? ती त्या वृद्धेसमोर केस मोकळे सोडून बसली. त्या वृद्धेने ती विषारी फणी तिच्या केसात घालताच फणीतले विष तिच्या डोक्यात उतरले. स्नो–व्हाईट तत्काळ बेशुद्ध पडली.

ते पाहून कपटी राणी छद्मीपणाने हसून म्हणाली, ‘बरं झालं! आज ही देखणी मेली.’ ती घाईघाईने तेथून निघून गेली.

थोड्याच वेळात सात बुटके घरी आले. संध्याकाळ होत आली होती. त्यांनी पाहिले स्नो–व्हाईट पुन्हा बेशुद्ध होऊन अस्ताव्यस्त पडली आहे. तिचे केस मोकळे असून, केसात एक फणी अडकली आहे. त्यांनी ती फणी फेकून दिली. सुदैवाने स्नो–व्हाईटला अजून विष भिनले नव्हते. बुटक्यांनी गुलाबपाणी शिंपडून स्नो–व्हाईटला सावध केले.

स्नो–व्हाईटने काय घडले ते बुटक्यांना सांगितले. ‘अगं तू कुणालाही घरात घेऊ नकोस. आज अगदी मरता मरता वाचलीस बरं का! दाराला आतून कडी लावून गप्प बसत जा.’

इकडे कपटी राणी घरी आली. तिने वृद्धेचे कपडे बदलले. तोंड धुतले व आरशापुढे जाऊन उभी राहिली व म्हणाली–

‘हे बिलोरी आरशा, तू पाहतोस मला सारखं–
मला सांग खरं, माझ्याइतकं सुंदर आहे कोणी दुसरं?’

जादूचा आरसा पटकन् म्हणाला–

‘अगं अगं राणी, तुझ्या प्रयत्नावर पडलं पाणी
दरीतल्या बुटक्यांच्या घरी, सुरक्षित आहे परी
स्नो–व्हाईट तिचं नावं, कुणी म्हणतो हिमगौरी
तुझ्यापेक्षा सुंदर ती, चंद्रासारखी देखणी!’

राणीला फार आश्चर्य वाटले आणि तितकाच रागही आला. ‘मी इतके प्रयत्न करूनही ही स्नो–व्हाईट जिवंत राहते तरी कशी? आता काहीतरी जालीम उपाय केला पाहिजे.’ असा विचार करून ती आपल्या महालात गेली. तिने एक सफरचंद घेतले व त्यात जहाल विष भरले. एका टोपलीमध्ये भरपूर सफरचंद घेतली आणि वरती ते विषारी सफरचंद ठेवले. पुन्हा तिने एका म्हातारीचे रूप घेतले व स्नो–व्हाईटच्या घराजवळ आली. त्या घराचे दार ठोठावत ती म्हणाली, ‘सफरचंद घ्या सफरचंद, कोणी आहे का घरात?’

स्नो–व्हाईट खिडकीतून डोकावत म्हणाली,

‘निघून जा इथून मी अनोळखी माणसाला घरात घेऊ शकत नाही.’